# शिक्षणात 'एस. डीं.'चे मोठे योगदान

म. टा. वृत्तसेवा, इस्लामपूर

'स्वातंत्र्यपूर्व काळातील विपरीत परिस्थितीत शिक्षणाच्या माध्यमातून तत्कालीन समाजव्यवस्था सुधारण्यासाठी दिवंगत खासदार एस. डी. पाटील यांनी प्रयत्न केले. त्यांच्या निःस्वार्थ सेवेतून व शिक्षण प्रसारातून सामाजिक व सांस्कृतिक जाणिवा समृद्ध झाल्या,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी केले.

खासदार पाटील यांच्या १०८ व्या जयंतीनिमित्त इस्लामपुरात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी वाळवा तालुका एज्युकेशन सोसायटीचे मानद सचिव ॲड. बी. एस. पाटील होते. प्रारंभी खासदार पाटील यांच्या पुतळ्यास कुलगुरू डॉ. शिंदे, कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर इंडियाचे अध्यक्ष आर्किटेक्ट विजय गर्ग, भारती विद्यापीठाचे कार्यवाह आमदार डॉ. विश्वजित कदम यांनी अभिवादन केले. त्यानंतर खा. एस. डी. पाटील चॅरिटेबल ट्रस्टच्यावतीने आयोजित केलेल्या ३४ व्या आंतरराज्यस्तरीय हॉकी स्पर्धेचा प्रारंभही त्यांच्या हस्ते झाला.

कार्यक्रमाचे संयोजन अध्यक्ष सखाराम जाधव व सामना समितीचे अध्यक्ष संजय पाटील यांनी केले.




खासदार एस. डी. पाटील यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमात बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. शेजारी ॲड. धैर्यशील पाटील, आमदार विश्वजित कदम, आर्किटेक्ट विजय गर्ग, ॲड. बी. एस. पाटील, आदी.

## कुलगुरू डॉ. शिंदे यांचे प्रतिपादन

आमदार डॉ. विश्वजित कदम म्हणाले, 'खासदार पाटील यांचे कर्तृत्व व त्यांचे बहुजनांसाठीचे सामाजिक कार्य दिशादायी आहे. साक्षरतेतून समाजविकासासाठी त्यांनी दिलेले विचार आदर्श आहेत.'

ॲड. बी. एस. पाटील म्हणाले, 'प्रत्येकाने स्वतः समाधानी राहून इतरांना सद्विचारातून समाधानी करावे. कुटुंबव्यवस्था उद्ध्वस्त होत असताना खासदार पाटील यांच्या संस्कारांप्रमाणे सत्त्वशील व चारित्र्यसंपन्न बनण्याचा प्रत्येकाने प्रयत्न करावा.'

विजय गर्ग यांचेही भाषण झाले. याप्रसंगी 'शब्दअंतर्यामी' त्रैमासिकाचे प्रकाशन झाले. ॲड. धैर्यशील पाटील स्वागत केले. यावेळी डॉ. डी. आर. मोरे, अरुणादेवी पाटील, बाळासाहेब पाटील, प्रकाशभाई शहा, आदी उपस्थित होते. सुमेधा दातार यांनी सूत्रसंचालन केले. प्राचार्य डॉ. सोमकांत जावरकर यांनी आभार मानले.

# यजमान इस्लामपूरसह कोल्हापूर पोलिस विजयी

म. टा. वृत्तसेवा, इस्लामपूर

खासदार एस. डी. पाटील यांच्या जयंतीनिमित्त बुधवारपासून सुरू झालेल्या सुवर्णचषक आंतरराज्यस्तरीय हॉकी स्पर्धेत पहिल्या दिवशी यजमान इस्लामपूरसह कोल्हापूर पोलिस, महाराष्ट्र क्रीडा मंडळ, कोल्हापूर, यंगस्टार स्पोर्ट्स क्लब हुबळी या संघांनी विजयी सलामी दिली, तर शेवटचा महाराष्ट्र क्रीडा मंडळ कोल्हापूर आणि प्रकाश सपकाळ ॲकॅडमी पुणे या संघांदरम्यानचा सामना बरोबरीत सुटला.

बुधवारी सकाळी येथील एस. डी. पाटील क्रीडांगणावर शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू देवानंद शिंदे, विजय गर्ग, ॲड. बी. एस. पाटील, ॲड. धैर्यशील पाटील, राष्ट्रीय हॉकीपटू संजय पाटील यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्‍घाटन झाले. सकाळच्या पहिल्या सत्रात पहिला सामना मुंबई सिटी पोलिस विरुद्ध कोल्हापूर पोलिस यांच्यात झाला. कोल्हापूर पोलिसांनी हा सामना ४-१ गोल फरकाने जिंकला. दुसरा सामना महाराष्ट्र क्रीडा मंडळ कोल्हापूर व साऊथ वेस्टर्न रेल्वे हुबळी संघांदरम्यान झाला. कोल्हापूर पोलिस आणि यजमान एस. डी. पाटील (रेड) या संघांदरम्यानचा सामना कोल्हापूर पोलिसांनी ४-० गोलफरकांनी एकतर्फी जिंकला. एस. डी. पाटील ट्रस्ट, इस्लामपूर आणि सातारा जिल्हा हॉकी संघटना, फलटण हा सामना यजमान संघाने ५-१ गोलफरकांनी जिंकला. शेवटचा सामना महाराष्ट्र क्रीडा मंडळ कोल्हापूर व प्रकाश सपकाळ ॲकॅडमी पुणेदरम्यान झाला. अत्यंत चुरशीने झालेला हा सामना २-२ असा बरोबरीत सुटला. पुण्याच्या अथर्व कांबळेला सामनावीर घोषित केले. सागर जाधव, अनिकेत मोरे, रमेश उत्तेकर, आदींनी पंच म्हणून काम पहिले.

**एस. डी. पाटील सुवर्णचषक हॉकी स्पर्धा**

लोकमत

# शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ २२ फेब्रुवारीला

## 'नॅक'चे एस. सी. शर्मा यांची प्रमुख उपस्थिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाचा ५५ वा दीक्षांत समारंभ दि. २२ फेब्रुवारीला दुपारी दोन वाजता होणार आहे. समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलपती तथा राज्यपाल सी. विद्यासागर राव, तर बंगलोरच्या नॅशनल असेसमेंट अँड ॲक्रिडिटेशन कौन्सिलचे (राष्ट्रीय मूल्यांकन एवं प्रत्यायन परिषद) संचालक डॉ. एस. सी. शर्मा प्रमुख उपस्थित असणार आहेत , अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी बुधवारी दिली.

या दीक्षान्त समारंभामध्ये पदवी, पदविका प्रमाणपत्र मागणीसाठीचा अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया जुलै ते सप्टेंबर २०१८ या कालावधीमध्ये राबविण्यात आली. त्याअंतर्गत विद्यापीठाकडे सुमारे ५० हजार अर्ज दाखल झाले. या वर्षी विद्यापीठातर्फे ४९ हजार स्नातकांना पदव्या प्रदान केल्या जाणार आहेत. त्यांतील २४ हजार स्नातक हे प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी स्वीकारणार आहेत. उर्वरित स्नातकांना पोस्टाद्वारे पदव्या पाठविण्यात येणार आहे. या समारंभाची तयारी सुरु झाली आहे. नव्या विद्यापीठ कायद्यानुसार या समारंभाच्या आयोजनाबाबत काही बदल करावे लागणार आहेत. त्याबाबतचा निर्णय या आठवड्यात होणाऱ्या विद्या परिषदेच्या बैठकीत होईल, अशी माहिती काकडे यांनी दिली.

पुढारी

# विद्यापीठाचा २२ फेब्रुवारी रोजी दीक्षान्त समारंभ

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचा दीक्षान्त समारंभ २२ फेब्रुवारीला होणार आहे. हा ५५ वा दीक्षान्त समारंभ दुपारी २ वाजता असणार आहे.

दीक्षान्त समारंभास महाराष्ट्राचे राज्यपाल सी. विद्यासागर राव, बंगळूरच्या नॅशनल असेसमेंट अँड ॲक्रिडिटेशन कौन्सिलचे संचालक डॉ. एस. सी. शर्मा हे मान्यवर प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

दीक्षान्त समारंभात विद्यापीठाच्या वतीने ४९ हजार स्नातकांना पदव्या दिल्या जातील. यामध्ये २४ हजार स्नातक हे प्रत्यक्ष उपस्थित राहून पदवी स्वीकारतील, अशी माहिती प्रशासनाच्या वतीने देण्यात आली. इतर स्नातकांना पोस्टाच्या माध्यमातून पदव्या पाठविण्यात येणार आहेत. प्रशासनाच्या वतीने विविध समित्यांच्या माध्यमातून या समारंभाची तयारी सुरू आहे. विद्यार्थ्यांना आवश्यक ती माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळाच्या माध्यमातून दिली जात आहे.

# दीक्षान्त समारंभ २२ फेब्रुवारीला

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर


शिवाजी विद्यापीठाचा ५५ वा दीक्षान्त समारंभ २२ फेब्रुवारी रोजी होणार आहे. विद्यापीठाच्या प्रांगणात दुपारी २ वाजता हा कार्यक्रम होणार आहे . शिवाजी विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी ही माहिती प्रसिद्धी पत्रकातून दिली आहे.

विद्यापीठाच्या यंदाच्या दीक्षान्त समारंभाला कुलपती तथा बंगळुरू येथील नॅशनल असेसमेंट अँड अॅक्रीडीटेशन कौन्सिलचे (नॅक) संचालक डॉ. एस. सी. शर्मा हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. शर्मा यांच्या हस्ते स्नातकांना पदवीप्रमाणपत्र, पीएच.डी. पदवी प्रदान करणे तसेच सुवर्णपदक प्रदान कार्यक्रम होणार आहे. राज्यपाल सी. विद्यासागर हे दीक्षान्त समारंभाचे अध्यक्षसथान भूषविणार आहेत. दीक्षान्त समारंभाची तयारी विद्यापीठ प्रशासनाच्यावतीने सुरू करण्यात आली आहे. यंदाही ५० हजाराहून अधिक स्नातकांना पदवी प्रमाणपत्रे देण्यात येणार आहेत. तसेच पीएच.डी. पदवी जाहीर झालेल्या संशोधक विद्यार्थ्यांनाही प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे.

# विद्यापीठ-सीएसआयआरमध्ये करार

कोल्हापूर टाइम्स टीम





मटा एज्युकेशन

'प्रयोगशाळेत संशोधकाने एकट्याने संशोधन करण्याचे दिवस आता मागे पडले असून उत्कृष्ट संशोधन कार्यासाठी विविध संस्थांनी संयुक्त प्रकल्प हाती घेण्याची गरज आहे. त्यादृष्टीने शिवाजी विद्यापीठ आणि सीएसआयआर-एनसीएल यांच्या दरम्यानचा सामंजस्य करार दोन्ही संस्थांसाठी अत्यंत उपयुक्त ठरेल,' असा विश्वास पुण्याच्या राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळेचे (एनसीएल) मुख्य शास्त्रज्ञ डॉ. पी. पी. वडगावकर यांनी आज येथे व्यक्त केला.

शिवाजी विद्यापीठ आणि सीएसआयआर-एनसीएल यांच्यात आज संशोधनविषयक सहकार्याचा सामंजस्य करार झाला. त्यावेळी ते बोलत होते.

डॉ. वडगावकर म्हणाले,'उत्कृष्ट संशोधनासाठी संयुक्त प्रकल्प हाती घेणे आज आवश्यक झाले आहे. त्यासाठी संशोधन संस्थांनी, तेथील संशोधकांनी एकत्र येऊन एकमेकांशी चांगला परिचय करून घेतला पाहिजे. आपापल्या संशोधन क्षेत्राची माहिती एकमेकांना दिली पाहिजे. त्यातून संशोधनाच्या नवनव्या संधी सामोऱ्या येतील. यामध्ये आंतरविद्याशाखीय संशोधन प्रकल्पांचेही महत्त्व मोठ्या प्रमाणात वाढले आहे. सामंजस्य करारातून ज्ञानाची, माहितीचे आदानप्रदान होईल. त्याचबरोबर विद्यार्थ्यांसाठी संशोधनाची दारे खुली होतील.'

यावेळी सामंजस्य करारावर विद्यापीठाच्यावतीने प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी, तर एनसीएलच्या वतीने डॉ. वडगावकर यांनी स्वाक्षरी केल्या. यावेळी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, आंतरविद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. अकल्पिता अरविंदेकर, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे. एस. बागी यांच्यासह विविध अधिविभागांचे प्रमुख, शिक्षक उपस्थित होते.

# 'डी. डी. शिंदे'मध्ये बक्षीस वितरण

कोल्हापूर टाइम्स टीम

'शिक्षण घेताना हार जीत असतेच, पण निराश न होता पुन्हा जोमाने प्रयत्न करून यशापर्यंत पोहचले पाहिजे. सुप्त गुणांचा विकास करुन स्वतःला ओळखून प्रगती साधली पाहिजे.'असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी केले.

येथील डी. डी. शिंदे सरकार कॉलेजतर्फे आयोजित बक्षीस वितरण समारंभात ते बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष चारुदत्त शिंदे यांच्या हस्ते प्रमुख काकडे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. प्रारंभी माजी प्राचार्य आबासाहेब शिंदे यांच्या प्रतिमेस प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले.

कॉलेजचे प्राचार्य डॉ. पी. आर. शेवाळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. ए. बी. पाटील यांनी वार्षिक अहवाल वाचन केले. कल्याणी मिरजकर, नेहा पाचंगे, स्वप्नाली पाटील यांनी सूत्रसंचालन केले. स्नेहा कुलकर्णी यांनी आभार मानले.




डी. डी. शिंदे सरकार कॉलेजमध्ये आयोजित कार्यक्रमात बोलताना डॉ. महेश काकडे. सोबत प्रा. विलास पोवार, संस्था अध्यक्ष चारुदत्त शिंदे, प्राचार्य पी. आर. शेवाळे.

24 JAN 2019

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शेतीच्या कंपनीकरणाची गरज

## - सुधाकर जाधव

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

शेतकऱ्यांसमोरील समस्या संपवण्यासाठी त्यांचा जमिनीवरील मालकी हक्क कायम ठेवून शेतीचे कंपनीकरण करण्याची गरज निर्माण झाली आहे, असे प्रतिपादन पांढरकवडा (यवतमाळ) येथील ज्येष्ठ पत्रकार तथा कृषी विचारवंत सुधाकर जाधव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटतर्फे आयोजित 'समकालीन शेतीचे प्रश्न आणि युवक' या विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते.



**कोल्हापूर : ज्येष्ठ पत्रकार सुधाकर जाधव यांच्या 'शेतकरी स्वातंत्र्याची रणनीती' या पुस्तकाचे प्रकाशन करताना डॉ. प्रकाश पवार. सोबत डॉ. माया देशपांडे, रावसाहेब पुजारी आणि अलोक जत्राटकर.**

सुधाकर जाधव म्हणाले, शेतजमिनीचे तुकडे आणि वाटण्या हा भारतीय शेतीसमोरचा मोठा प्रश्न आहे. शेती हा जणू अल्पभूधारक शेतकऱ्यांचा मेळावाच बनला आहे. अल्पभूधारकांना कोणी कर्ज देत नाही, ही त्यातली आणखी एक मोठी समस्या आहे. या समस्येवर कंपनीकरणाचा तोडगा उपयुक्त ठरेल. सर्व शेतकऱ्यांच्या जमिनी एकत्र करून त्या एका कंपनीच्या छताखाली आणल्या पाहिजेत. संसाधनांचा वापरही एकत्रितच करावा. त्यांच्या जमिनीच्या प्रमाणात त्यांना शेअर द्यावेत आणि नफ्यात लाभांश द्यावा. शेतकऱ्यांना तेथे आठ तास रोजगार द्यावा. त्यांचा मेहनताना द्यावा. अशा प्रकारे काम केल्यास कोरडवाहू शेतकऱ्यांनाही ओलिताचे लाभ मिळतील. यादृष्टीने आता शेतीचा विचार करण्याची गरज आहे.

तरुण शेती करण्यास तयार होत नाही आणि शेती करणाऱ्या मुलाला अगदी शेतकरीसुद्धा आपली मुलगी द्यायला तयार होत नाही, या दोन्ही अत्यंत गंभीर समस्यांनी आपली शेती आणि तरुण शेतकरी ग्रासला आहे. इतर रोजगार, धंदा नसला तरीही आज तरुण शेती करण्यास तयार होत नाही. उलट शेतीतून आपली सुटका कधी होईल, याचाच विचार आणि प्रयत्न सुरू असतात. राज्यकर्त्यांसाठी, शेतीचा प्रश्न हा शेतमाल हमीभावाचा आणि शेतीवरील कर्जापुरताच मर्यादित आहे. शेतकरी संघटनांची आंदोलनेही तेवढ्यापुरतीच मर्यादित आहेत. त्यामुळे शेतीचे प्रश्न वर्षानुवर्षे त्याच चक्रव्यूहाच्या गर्तेत आहेत. त्यामुळे शेतीवर अवलंबून असलेल्या अतिरिक्त लोकसंख्येला शेतीतून बाहेर काढून शेतीत नियोजनपूर्वक रोजगार निर्मिती करणे गरजेचे आहे.

सुधाकर जाधव यांनी लिहिलेल्या 'शेतकरी स्वातंत्र्यांची रणनीती' या तेजस प्रकाशनच्या पुस्तकाचे डॉ. प्रकाश पवार यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी डॉ. पवार यांनी प्रास्ताविक केले. डॉ. कविता वड्राळे यांनी परिचय करून दिला, तर डॉ. संतोष सुतार यांनी आभार मानले. यावेळी रावसाहेब पुजारी, डॉ. माया देशपांडे, डॉ. ओमप्रकाश कलमे यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय सेवक आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
24 JAN 2019
पुण्यनगरी

# विद्यापीठात बोस जयंती साजरी

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठात नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी करण्यात आली. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते बोस यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक आर. व्ही. गुरव, इनोव्हेशन व इनक्युबेशन सेंटरचे संचालक आर. के. कामत, इतिहास अधिविभागाचे अवनीश पाटील, उपकुलसचिव व्ही. एन. शिंदे, विलास सोयम, पी. एस. पांडव, दत्तात्रय मचाले आदी उपस्थित होते.

लोकमत

## महत्त्वाचे

# विद्यापीठात सुभाषचंद्र बोस यांना अभिवादन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात बुधवारी नेताजी सुभाषचंद्र बोस यांची जयंती साजरी करण्यात आली. प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, इनोव्हेशन व इनक्युबेशन सेंटरचे संचालक डॉ. आर. के. कामत, इतिहास अधिविभागाचे डॉ. अवनीश पाटील, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, विलास सोयम, पी. एस. पांडव, दत्तात्रय मचाले, आदी उपस्थित होते.